प्रसिद्धी पत्रक
PRESS NOTE
CITY & INDUSTRIAL DEVELOPMENT CORPORATION OF MAHARASHTRA LTD.
**Regd. Office:** Nirmal, 2nd Floor, Nariman Point, Mumbai 400 021. Tel.: 91-22-6650 0900; FAX:91-22-6650 0933; www.cidcoindia.com
**Head Office:** CIDCO Bhavan, CBD Belapur, Navi Mumbai 400 614. Tel.: 91-22-6791 8241; Fax: 91-22-6791 8294;
For updated information, follow us on - @cidco_ltd :/cidco YouTube CIDCO Ltd. @cidco_ltd

दि. 05.08.2021

**सिक्कीमच्या मुख्यमंत्र्याची सिडको भवनला सदिच्छा भेट**
**खारघर येथील सिक्कीम भवन भूखंडाची केली पाहणी**

सिक्कीमचे मुख्यमंत्री मा. श्री. प्रेमसिंग तमांग यांनी 05 ऑगस्ट 2021 रोजी सिडको भवनला भेट देऊन सिडको महामंडळाकडून सिक्कीम भवनाच्या उभारणीकरिता निश्चित करण्यात आलेल्या, नवी मुंबईतील खारघर येथील 4000 चौ.मी. च्या भूखंडाचीही पाहणी केली. या भेटीवेळी त्यांनी सिडकोचे उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक डॉ. संजय मुखर्जी यांच्याकडे सदर भूखंड सिक्कीम सरकारला प्रदान केल्याबद्दल सिडको तसेच महाराष्ट्र शासनाप्रति आभार व्यक्त केले. सिडकोकडून नवी मुंबईच्या खारघर नोडमधील भूखंड क्र. 19 आणि 20 सिक्कीम भवनच्या उभारणीकरिता प्रदान करण्यात आले आहेत.

आपल्या भेटी दरम्यान श्री. प्रेमसिंग तमांग यांनी नवी मुंबईतील संधानता (कनेक्टिव्हिटी), सार्वजनिक परिवहन, पर्यावरण, आरोग्य आणि सामाजिक सुविधा क्षेत्रांत होत असलेल्या पायाभूत सुविधांच्या विकासाबद्दल प्रशंसोद्‌गार काढले. महाराष्ट्र आणि सिक्कीममधील सहकार्याचे हे पर्व वृद्धिंगत व्हावे, अशी इच्छा त्यांनी व्यक्त केली.

**"सिक्कीम भवनच्या उभारणीसाठी देण्यात आलेल्या या भूखंडामुळे लवकरात लवकर सिक्कीम भवनाचे काम मार्गी लागेल. सिक्कीम भवनाच्या उभारणीमुळे कर्करोगाच्या उपचारांसाठी मुंबई आणि नवी मुंबईमध्ये येणाऱ्या सिक्कीममधील गरजू नागरिकांच्या निवाऱ्याची सोय होणार आहे. कधीकाळी दुर्लक्षित असलेल्या प्रदेशाचे रूपांतर नवी मुंबईसारख्या आंतरराष्ट्रीय शहरामध्ये करून शहरातील जमिनीचे मूल्य वाढवण्यासाठी सिडकोने केलेल्या प्रयत्नांचाही मी मनापासून कौतुक करतो."**
**श्री. प्रेमसिंग तमांग, मुख्यमंत्री, सिक्कीम**

**"सामाजिक उद्देशांकरिता भूखंड देण्यास सिडकोने आपल्या स्थापनेपासूनच प्राधान्य दिले आहे. सिक्कीम भवनाच्या उभारणीनंतर, येथे येणाऱ्या सिक्कीमच्या नागरिकांची निवासाची व्यवस्था**

**होण्याबरोबरच महाराष्ट्र आणि सिक्कीम यांमध्ये एक अनोखा सांस्कृतिक व जिव्हाळयाचा बंध प्रस्थापित होणार आहे.**

**डॉ. संजय मुखर्जी,**
**उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, सिडको**

या प्रसंगी डॉ. संजय मुखर्जी, उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, सिडकोतील यांसह श्री. कैलास शिंदे, सहव्यवस्थापकीय संचालक, श्री. के. गोडबोले, मुख्य अभियंता (नवी मुंबई), श्री. प्रशांत भांगरे, पणन व्यवस्थापक (वाणिज्यिक), सिडकोतील अन्य विभाग प्रमुख आणि सिक्कीम सरकारचे अधिकारी उपस्थित होते.

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

मा. संपादक महोदय,

वरील बातमीस आपल्या लोकप्रिय वर्तमानपत्रातून ठळक प्रसिद्धि देऊन उपकृत करावे, ही विनंती.

**जनसंपर्क विभाग, सिडको**